स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१**

**फो.नं.०२०-२६१२२०७६**
**फॅक्स-०२०/२६१२७०४१**

email:ddtp.ho@maharashtra.gov.in
email: do_tpv५@rediffmail.com

**विकास योजना, तुळजापूर (दुसरी सुधारित)**
**जि. धाराशिव.**

मौ.तुळजापूर येथील स.क्र.१३७/२ या जमिनीमधील ७८ गुंठे क्षेत्राबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७(२) अन्वयेचे आदेश प्रसिध्द करणेबाबत..

**आदेश क्र.:** जा.क्र.डि.टी.पी./वि.यो.तुळजापूर(दु.सु.)/वि.यो.रस्ता /कलम-१२७(२)/आदेश/ टिपीव्ही-५/१९५९ , दि. २८ .०३ .२०२५.

सोबतचे मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

श्रीम. फोरे

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 677 दिनांक- 01.04.25
संबंधित अधि./कर्म.
2.9-4-25 उ.न.र.र.

(प्रदीप अं. बास्टेवाड)
प्र.कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-५,
मुख्य कार्यालय, पुणे.

प्रति,

१. मा.अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-३०), मंत्रालय, मुंबई -३२.
२. मा.सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
३. मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
४. मा.जिल्हाधिकारी, धाराशिव.
५. मा.उपसंचालक,नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/-आपणांस विनंती करण्यात येते की, सदरचे आदेश त्यासंबंधीच्या संकलन नस्तीमध्ये अभिलेखार्थ जोडावेत. तसेच सदरचे आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. मा.सहायक संचालक, नगर रचना, धाराशिव शाखा, धाराशिव.

/- प्रस्तुत प्रकरणी आपणांस विनंती करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **पाच** प्रती संचालनालयास विहीत मार्गाने सादर कराव्यात.

७. मा.व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर.

/- आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतचे मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, औरंगाबाद विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या ५ छापील प्रती नगर रचना संचालनालयास व प्रत्येकी २ छापील प्रती मा.सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर आणि मा.सहायक संचालक, नगर रचना, धाराशिव शाखा, धाराशिव यांना पाठवाव्यात.

८. मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर, जि.धाराशिव.

९. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.

/- सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

१०. संबंधित अर्जदार श्री.बापूसाहेब आनंदराव कदम-पाटील, रा.आनंद निवास कदम-पाटील वाडा, कल्लोळ तिर्थाशेजारी, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव.

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळ मजला, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६१३४६०३/२६१२२०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in
ddtpho_pune@rediffmail.com

## आदेश

जा.क्र.डि.टी.पी./वि.यो.तुळजापूर(दु.सु.)/५४ मी. (३० मी.+१२ मी.+१२ मी.) वि.यो.रस्ता/कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-५/ ७६५८ , दि.२८.०३.२०२५

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६:-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीनुसार तुळजापूर नगर परिषदेची विकास योजना (दुसरी सुधारित) शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-३४१०/२९५/सिआर-१२६/अ/२०१०/नवि-३०, दि.१४.१०.२०१० अन्वये मंजूर केली असून (यापुढे "**उक्त अधिसूचना**" असे संबोधिले आहे), ती दि.११.११.२०१० पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "**उक्त मंजूर विकास योजना**" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजे तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव येथील स.क्र.१३७/२ ही जमीन उत्तर-दक्षिण ५४ मी. रूंदीच्या बाह्यवळण रस्त्याने (३० मी. रूंद विकास योजना रस्ता व दोन्ही बाजूस १२ मी. रूंदीचे दोन सेवा रस्ते) (**यापुढे "उक्त विकास योजना रस्ता"** असे संबोधिले आहे) बाधित होत आहे आणि उक्त विकास योजना रस्त्याचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण तुळजापूर नगर परिषद आहे (**यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त विकास योजना रस्त्याखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे "**उक्त जमीन मालक**" असे संबोधिले आहे) मौजे तुळजापूर येथील स.क्र. १३७/२ या जमिनीमधील (यापुढे "**उक्त जमीन**" असे संबोधिले आहे) उक्त विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्रासाठी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसारची दि.११.१०.२०२१ रोजीची सूचना उक्त समुचित प्राधिकरणावर बजावलेली असून (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिले आहे) ती उक्त समुचित प्राधिकरणास दि.११.१०.२०२१ रोजी प्राप्त झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना उक्त समुचित प्राधिकरणास प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, २४ महिन्यांच्या विहित मुदतीत उक्त विकास योजना रस्त्याखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) मधील तरतूदींनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी दि.०६.०५.२०२४ रोजीच्या पत्र क्र. २०२४/१२७० अन्वये उक्त सूचना प्राप्त झाल्यानंतर, आजतागायत, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त विकास योजना रस्त्याने बाधित जमिनीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेकडे सादर केला नसल्याने, उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) चे तरतूदीन्वयेची अधिसूचना प्रसिध्द होण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याने, उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार उक्त विकास योजना रस्ता उक्त जमीन मालक यांचे उक्त जमिनीपुरते व्यपगत झाले असल्याने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतूदीन्वयेचे आदेश प्रसिध्द होणेबाबत सादर केलेल्या अहवालामध्ये नमूद केले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी पत्र क्र. १४४५, दि.०२.०७.२०२४ अन्वये नगर परिषद, तुळजापूर यांचे पत्र क्र.२०२४/१२७०, दि.०६.०५.२०२४ व शाखा कार्यालय, धाराशिव यांचे पत्र क्र. ७४५, दि.२८.०६.२०२४ चे अहवाल पाहता, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जमीन मालक यांनी उक्त सूचना बजावलेल्या दिनांकापासून २४ महिन्याच्या विहीत कालावधीमध्ये उक्त जमीन संपादन केलेली नाही किंवा उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) चे तरतूदीन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात तशा आशयाची घोषणा करण्यात आलेली नसल्याने, उक्त जमीन मालक यांच्या उक्त जमिनीपैकीच्या क्षेत्रावरील उक्त विकास योजना रस्ता व्यपगत झाल्याचे मानण्यास हरकत नसावी व याबाबत संचालनालयाच्या स्तरावरुन उक्त अधिनियमाचे कलम-१२७(२) चे तरतूदीन्वयेचे आदेश प्रसिध्दीबाबत निर्णय होणेस विनंती आहे, असा अहवाल सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीवरील उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त विकास योजना रस्त्याबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीवरील उक्त विकास योजना रस्ता व्यपगत झाल्याबाबतचे आदेश उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीनुसार निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि. ०१.१२.२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त विकास योजना रस्ता व्यपगत झाला आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेतः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहेः-

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण/प्रस्ताव | उक्त सूचनेखालील उक्त जमिनीचा तपशिल | उक्त विकास योजना रस्त्यातून भागशः व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद, तुळजापूर, मौजे तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव. | ५४ मी. रुंद बाह्यवळण रस्ता (३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता + दोन १२.०० मी. रुंद सेवा रस्ते) | स.क्र.१३७/२ पै. | ०.७८ हे. |

**टिप:-**

०१) उक्त विकास योजना रस्त्यामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

०२) उक्त जमिनीमधील उक्त विकास योजना रस्ता रद्द झालेला असला तरी देखील. उक्त विकास योजना रस्त्याची संलग्नता राखण्याच्या दृष्टीने नगर परिषदेने पर्यायी रस्त्याची व्यवस्था करणे अथवा उक्त विकास योजना रस्त्याने बाधित जागा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतुदींनुसार रस्त्याची आखणी करून अशी जागा भूसंपादित करणे नियोजन प्राधिकरणास आवश्यक राहील.

०३) उक्त जमिनीचे उक्त विकास योजना रस्त्यातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि.धाराशिव यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

०४) सदर आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Maharashtra State
Directorate of Town Planning and Valuation
Department, Central Building, Pune 411 001

Telephone No. 020-26122076 Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

## ORDER

No. D.T.P/D.P.Tuljapur (S.R.)/54 m. (30 m.+12 m+12 m) D.P.Road/ Sec-127(2)/Order/
TPV-V/1659, Date:-28.03.2025

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Development Plan of Tuljapur Municipal Council (Second Revised) has been sanctioned as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government of Maharashtra in Urban Development Department vide Notification No. TPS-3410/295/C.R.-126/A/2010/UD-30, dated 14.10.2010 (hereinafter referred to as "**the said Notification**") and the same has come into force with effect from 11.11.2010 (hereinafter referred to as "**the said sanctioned Development Plan**");

And whereas, as per the said sanctioned Development Plan, the land bearing S.No. 137/2 of Mouje Tuljapur, Tal. Tuljapur, Dist. Dharashiv is affected by 54 m. wide North-South By-pass Road (30 m. wide Development Plan Road with two 12 m. wide service roads on each side) (hereinafter referred to as "**the said Development Plan Road**") and the Appropriate Authority for acquisition and development of the said Development Plan Road is Municipal Council, Tuljapur (hereinafter referred to as "**the said Appropriate Authority**");

And whereas, the Land under the said Development Plan Road has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said sanctioned Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "**the said Land Owners**") of the land bearing S.No. 137/2 of Mouje Tuljapur (hereinafter referred to as "**the said Land**") had served a Notice dated 11.10.2021 for the area affected by the said Development Plan Road as per the provisions of section 127(1) of the said Act (hereinafter



ABP

referred to as "**the said Notice**") on the said Appropriate Authority which was received by the said Appropriate Authority on 11.10.2021;

And whereas, the said Land under the said Development Plan Road is not acquired or no steps as required as per the provisions of section 127(1) of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period of 24 months after receipt of the said Notice;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Tuljapur vide letter No. 2024/1270 dt.06.05.2024 has submitted report stating that, after receipt of the said Notice, as the said Appropriate Authority, till date, has not submitted the proposal for acquisition of the said Land affected by the said Development Plan Road to the Collector, Dharashiv, the question of publication of the Notification as per the provisions of section 126(4) of the said Act does not arise, and since, the said Development Plan Road is lapsed upto the limit of the said Land of the said Land Owner, an order as per the provisions of section 127(2) of the said Act is to be promulgated;

And whereas, the Joint Director of Town Planning, Chatrapati Sambhajinagar Division, Chatrapati Sambhajinagar vide its letter No.1445, dt. 02.07.2024 has submitted report stating that, in view of the reports of the Municipal Council, Tuljapur vide its letter No.2024/1270, dt.06.05.2024 and Branch Office, Dharashiv, vide its letter No.745, dt. 28.06.2024 since the said Appropriate Authority has not acquired the said Land within the prescribed period of 24 months from the date of issue of the said Notice or no such declaration has been published in the Maharashtra Government Gazette as per provisions of section 126(4) of the said Act, there should be no objection to consider that, the said Development Plan Road on the area of the part of the said Land of the said Land Owner is lapsed and in this regard a decision is requested to be taken from the Directorate Level regarding the publication of the order as per the provisions of section 127(2) of the said Act;

And whereas, after considering the above facts in respect of, the said Development Plan Road in respect of the said Land in the said sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Development Plan Road in respect of the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 01.12.2016 has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127(2) of the said Act in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat/ Zilla Parishad as a Planning Authority to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the Schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Development Plan Road in respect of the said Land as per the provisions of section 127(2) of the said Act and for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as follows:-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added:-

**SCHEDULE**

| Sr.No. | Municipal Council, Mouja, Tal., Dist. | Reservation/Proposal of the said sanctioned Development Plan | Description of the said Land under the said Notice | Approximate Part Area lapsed from the said Development Plan Road (Ha.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Municipal Council, Tuljapur, Mouje Tuljapur, Tal. Tuljapur, Dist. Dharashiv. | 54 m. wide By-pass Road (30 m wide Development Plan Road + two 12 m. wide service roads) | S.No. 137/2 PT. | 0.78Ha. |

**Note:-**

1) The said Land so released from the said Development Plan Road shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.
2) Though the said Development Plan Road in the said land is lapsed, in order to maintain the alignment of the road it is necessary for the Planning Authority to make alternate

arrangement or to acquire the land affected by the said Development Plan Road by proposing new alignment under the provisions of the Maharashtra Muncipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965. To maintain the continuity of the said Development Plan Road.

3) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Development Plan Road, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Tuljapur, Tal. Tuljapur, Dist. Dharashiv during office hours on all working days for inspection to public up to one month.

4) This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in.**

TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT
DIRECTOR OF TOWN PLANNING
M.S. PUNE

**(Avinash B. Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.